# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 03.08.2024** **वार– शनिवार**

---

पाण्याचा विसर्ग

पुणे आणि परिसरात कालपासून पावसाच्या सरी कोसळत आहेत. घाटमाथा प्रदेशात जोराचे वारे आणि विजांसह मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. सततच्या पावसामुळ खडकवासला धरणातून पाण्याचा विसर्ग काल संध्याकाळापासून क्रमा क्रमाने वाढविण्यात आला आहे. मुळशी धरणाच्या सांडव्यावरून मुळा नदीपात्रात सुरू असलेला विसर्गही आज दुपारी तीन वाजता 20 हजार क्युसेक हून अधिक करण्यात आला. या पार्श्वभूमीवर विशेषतः नदीकाठच्या नागरिकांनी दक्षता घेण्याचं आवाहन पाटबंधारे विभागानं केलं आहे.

पाणीसाठा

पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण साखळीत आज संध्याकाळी पाच वाजेपर्यंत 93% म्हणजे 27.14 टीएमसी पाणीसाठा झाला आहे. पानशेत, वरस गाव आणि टेम घर ही धरण 90% पेक्षा जास्त भरली आहेत. खडकवासला धरणाच्या सांडव्यातून मुठा नदीपात्रात आज दुपारी बारा वाजल्यापासून 27 हजार 106 क्युसेक इतक्या वेगानं पाण्याचा विसर्ग चालू आहे. मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग झाल्याने शहरातील नदी काठचा रस्ता पाण्याखाली गेला असून इतर रस्त्यांवर वाहतूक कोंडी झाली आहे.

खड्डे

पिंपरी शहरातील सर्वच भागातील प्रमुख रस्त्यांवर पडलेले खड्डे कोणत्याही परिस्थितीत चार दिवसात बुजवण्याचे आदेश शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी महापालिका प्रशासनाला दिले. बारणे यांनी आज महापालिका अधिकारी आणि पोलिसांच्या एकत्रित बैठकीत या समस्येचा आढावा घेतला. पिंपरी शहराच्या भागांमध्ये खासगी प्रवासी बस थांबतात तिथं वाहन तळाची सुविधा उपलब्ध करुन त्याचं शुल्क वाहतुक दारांकडून वसूल करावं, अशी सूचनाही खासदार बारणे यांनी केली. पिंपरी शहरात कच-याचं साम्राज्य आहे. ठेकेदारांकडून व्यवस्थित काम केलं जात नाही. साथीचे आजारही वाढत आहेत. त्यामुळे शहरात अतिशय स्वच्छता राखण्याची काळजी घेण्याचे निर्देशही खासदार बारणे यांनी अधिका-यांना दिले.

डेंग्यू
पिंपरी शहरात डेंग्यू आणि चिकुनगुनियाच्या रूग्णांची संख्या वाढत असून आतापर्यंत 39 जणांना डेंग्यूची लागण झाली आहे. यामध्ये 19 पुरुष आणि 21 महिलांचा समावेश आहे. चिकुनगुनियाचे 98 संशयित रूग्ण आढळले असून त्यातील तिघांचा तपासणी अहवाल पॉझिटीव आला आहे.

किटकजन्य
पिंपरी चिंचवड शहरात किटकजन्य आजारांना आळा घालण्यासाठी महापालिकेच्या वतीनं सर्व भागात तपासणी मोहीम राबविण्यात येत असून गेल्या दोन महिन्यांच्या कालावधीत 22 लाख रुपयांपेक्षा अधिक दंड वसूल करण्यात आला आहे. महापालिकेच्या वतीनं शहरातील अंदाजे चार लाख घरांची तपासणी करण्यात आली, त्यापैकी 7 हजार सातशे दहा ठिकाणी डासांच्या अळ्या आढळून आल्या.

पीएमारडीए
स्थानिक ग्रामपंचायत, जीवन प्राधिकरण अथवा अन्य मार्गानं शाश्वत पाणी पुरवठा होणार असेल तरच यापुढील काळात पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या हद्दीत नवीन बांधकामाला परवानगी दिली जाणार आहे. पीएमआरडीए क्षेत्रात सुमारे 814 गावं असून त्यापैकी महापालिकेलगतच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर बांधकामं होत आहेत.

क्रांतिसिंह
भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील अग्रणी सैनिक क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती आज सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात साजरी करण्यात आली. कुलगुरू प्राध्यापक डॉक्टर सुरेश गोसावी, याच्यासह विविध मान्यवरांनी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. यावेळी शिक्षक, शिक्षकेतर सेवक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

लोहगाव विमानतळ
यावर्षी जानेवारी ते मार्च या पहिल्या तिमाहीत सोयी-सुविधा पुरवण्याच्या बाबतीत देशपातळीवर लोहगाव विमानतळाचा क्रमांक 71 वरून 76 पर्यंत खाली घसरला आहे. एकंदर 31 परिमाणांपैकी 17 परिमाणांमध्ये लोहगाव विमानतळाचा क्रमांक खाली आला आहे. या विमानतळावरून दररोज एकंदर 200 उड्डाणे होतात आणि लाखो प्रवासी प्रवास करतात

बिबट
पुणे जिल्ह्याच्या जुन्नर वनक्षेत्रात बिबट्यांची वाढती संख्या लक्षात घेऊन माणिकडोह इथल्या बिबट्या निवारा केंद्रातील 10 बिबट्यांना गुजरातमधील जामनगर इथल्या वंतरा प्राणी संग्रहालयात स्थलांतरित करण्यात आलं आहे. त्यात 6 नर आणि 4 मादी बिबट्यांचा समावेश आहे.

प्रदर्शन

ओळख देशभक्तांची - शाळा तिथे क्रांती मंदिर’ या संकल्पनेखाली 2 हजार क्रांतिकारकांच्या छायाचित्रांचं प्रदर्शन कर्नाळा धर्मादाय न्यासाद्वारे पुण्याच्या बालगंधर्व कला दीर्घिकेमध्ये उद्यापर्यंत सकाळी 11 ते रात्री 8 वाजेपर्यंत भरविण्यात आलं आहे. या प्रदर्शनात 2 हजार ज्ञात आणि अज्ञात क्रांतिकारकांची सविस्तर माहिती देण्यात आली आहे.

दंड

रेल्वेच्या पुणे विभागात गेल्या महिन्यात विनातिकीट तसंच अनियमित प्रवास करणारे आणि विनानोंदणी सामान नेणाऱ्या 14 हजारांहून अधिक प्रवाशांकडून 59 लाख रुपये दंड वसूल करण्यात आल्याची माहिती मध्य रेल्वेनं दिली आहे.

वाहतूक

पुणे शहरातील प्रमुख चौकांमध्ये वाहतुकीचं नियंत्रण करण्यासाठी भाजपचे 100 कार्यकर्ते आठवड्यातून एक दिवस पोलिसांना मदत करणार असल्याची माहिती  भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी दिली. वाहतूक कोंडीवर तातडीनं उपाय करण्यासाठी आज भाजपच्या शिष्टमंडळानं अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील  आणि शहर वाहतूक उपायुक्त रोहिदास पवार यांची भेट घेतली.

हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.